॥ टप टप टप काय बाहेर वाजतय ॥

गायिकाः आशा भोसले
गीतः ग. दि. माडगूळकर

टप टप टप काय बाहेर वाजतय ते पाहू,
चल ग आई, चल ग आई, पावसात जाऊं ॥ धृ. ॥

आकाशी गडगडते, म्हातारी का दळते?
गडड गुडुम, गडड गुडुम ऐकत ही राहूं ॥ १ ॥

भिर भिर भिर भिर अंगणात बघ वारे नाचतात
गर गर गर गर त्यासंगे चल गिरक्या घेऊं ॥ २ ॥

या गारा सटा सटा, आल्या पटा पटा,
चट चट चट वेचुनिया ओंजळीत घेऊं ॥ ३ ॥

फेर गुंगुनी धरू, भोवर्या परी फिरू,
ये पावसा, घे पैसा गीत गोड गाऊं ॥ ४ ॥

पहा फुले, लता तरु, चिमणी गाय वासरु,
चिंब भिजती, मी तरी का घरात राहू? ॥ ५ ॥